क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०३ दिनांक २६ / ०७ / २०१०

**विषय :** महाराष्ट्र राज्यातील माजी सैनीकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास सुरक्षा रक्षक पुरविण्याची कामे प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबत.

.....

महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८ दिनांक १८ जानेवारी २००२ अन्वये महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची (Maharashtra Ex.Serviceman's Corporation) स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८ दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ अन्वये सरकारी क्षेत्र/उप शासकीय मंडळे, महामंडळे/महानगर पालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/स्वायत्त संस्था/सहकारी संस्था/शासकीय कार्यालये यांना ज्या ज्या वेळी सुरक्षा रक्षक लागतील तेव्हा त्यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक न मागविता शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळातील माजी सैनिकामधूनच सुरक्षा रक्षक मागवावेत. तसेच महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ हे राज्य शासनाने स्थापन केलेले मान्यताप्राप्त महामंडळ असल्याने सदर महामंडळाकडून सुरक्षा रक्षक मागविताना निविदा पद्धतीचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही असे निर्देश दिले आहेत. उपरोक्त शासन निर्णयाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

२. सदर निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव काही काळ कंपनीच्या विचाराधीन होता. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन), व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनियम करून, महावितरण कंपनीच्या कार्यालयाकरिता बाह्य स्त्रोताद्वारे नियुक्तीकरिता मंजूर पदांच्या अधीन राहून जेंव्हा जेंव्हा सुरक्षा रक्षक ही पदे भरावी लागतील तेंव्हा तेंव्हा उपरोक्त शासन निर्णय क्र.मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८ दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ अन्वये दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करून महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फतच अशी पदे भरण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. महावितरण कंपनीतील कार्यालयांमध्ये बाह्य स्त्रोत्रांद्वारे सुरक्षा रक्षकांची पदे भरताना उपरोक्त शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशांचे कटाक्षाने पालन करावे.

४. सदर निर्देश हे परिपत्रक निर्गमित झालेल्या तारखेपासून अंमलात येतील. या अगोदर इतर खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत करार केलेले असल्यास सदर करार त्याची मुदत संपेपर्यंत लागू राहतील. यापुढे अशा करारांना मुदतवाढ देण्यात येऊ नये.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र - वरीलप्रमाणे.

(सु.य.पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Cir - F.N.348-Ex.Serviceman-Security.doc*
*26/7/10*

11C

**महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी राज्यात स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास सुरक्षा रक्षकपुरविण्याची कामे प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकःमासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २००२.

वाचा :- शासन निर्णय, क्रमांकःमासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४(९९)२८, दिनांक १८/१/२००२

**शासन निर्णय :-**

सैन्यदलातील (भूदल, नौदल व वायुदल) निवृत्त होणा-या सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यांकरिता विविध कल्याणकारी योजना राज्य आणि केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सेवानिवृत्त, अपंग सैनिक किंवा युध्दात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, यांकरिता देखील काही योजना आखण्यात आलेल्या आहेत. या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे राबविण्याकरिता माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कल्याणाकरिता शासन निर्णय, क्रमांकःमासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८,दिनांक १८/१/२००२ अन्वये महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची (Maharashtra Ex-serviceman's Corporation ) स्थापना करण्यात आली आहे.

२. या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या उद्दीष्टांमध्ये नमूद केल्या प्रमाणे माजी सैनिक सरकारी / निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरणे व खाजगी क्षेत्रातील सुरक्षा क्षेत्रात नोक-या उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशनमध्ये या स्वरुपाच्या कलमाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सरकारी क्षेत्र / उपक्रम, शासकीय मंडळे, महामंडळे / महानगर पालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वायत्त संस्था / सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये यांना ज्या ज्या वेळी सुरक्षा अधिकारी / कर्मचारी लागतील तेव्हा त्यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक न मागविता शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळातील माजी सैनिकामधूनच सुरक्षा रक्षक मागवावेत.तसेच महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ हे राज्य शासनाने

surve/shashahnir/1

JUN-09-2010 03:34 From:MESCO,PUNE To:02226476813 P.4

स्थापन केलेले मान्यता प्राप्त महामंडळ असल्याने सदर महामंडळाकडून सुरक्षा रक्षक मागवितांना निविदा पध्दतीचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही.

३. या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाला बृहन्मुंबई व ठाणे या परिसरात सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम २३ अनुसार सूट देण्याबाबत स्वतंत्र रित्या कार्यवाही करण्यात येत असून, त्याबाबत स्वतंत्र आदेश यथावकाश काढण्यात येतील.तो पर्यंत वरील परिच्छेद २ मधील निर्णय बृहन्मुंबई व ठाणे परिसरास लागू होणार नाही.

४. महासंचालक, पुनर्वास, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत सुरक्षा रक्षकाचे कंत्राट (कॉन्ट्रक्ट) चालविण्यासाठी मान्यता दिली असून त्यांच्या अधीन राहून, तसेच सदर महासंचालक , पुनर्वास, यांनी सुरक्षा रक्षकांसाठी वेळोवेळी निर्धारित केलेल्या सुधारित वेतनश्रेणी आणि त्यांच्या तद्संबंधीच्या अटीनुसार राज्यातील (बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा वगळून) इतर विविध शासकीय / निमशासकीय व खाजगी सेवांशी आवश्यक ते करार करुन त्यांना लागणारे सुरक्षा कर्मचारी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत पुरविण्यात यावेत.

हा शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१०८, दि.११.१०.२००२ तसेच वित्त विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०३९/२००२/व्यय-४, दि.३१.१०.२००२ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

ज. व. दिवाण
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व महानगर पालिका आयुक्त/ सर्व मुख्य अधिकारी, नगरपरिषदा,
अध्यक्ष,नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
महानगर आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण,मुंबई ,
मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंप[illegible] चवड प्राधिकरण,पिंपरी-चिंचवड,पुणे,
व्यवस्थापकीय संचालक,मह[illegible] औद्योगिक विकास महामंडळ,दुसरा मजला,निर्मल

5|C

महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी माजी सैनिक महामंडळाची (Mesco) स्थापना

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांकःमासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ जानेवारी, २००२.

**शासन निर्णय :-**

सैन्यदलातील (भूदल, नौदल व वायुदल) निवृत्त होणा-या सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता विविध कल्याणकारी योजना राज्य आणि केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सेवानिवृत्त, अपंग सैनिक किंवा युध्दात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, याकरिता देखील काही योजना आखण्यात आलेल्या आहेत. या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कल्याणाकरिता एक महामंडळ स्थापन करावे, असा विचार १९८२ पासून शासनाच्या विचाराधीन होता. अलिकडेच कारगिल विजय स्मृतीदिनानिमित्त दि.२८ जुलै, २००१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी राज्यात अशा महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी माजी सैनिक महामंडळाची (Maharashtra Ex-serviceman's Corporation) स्थापन करण्याचा शासनाने आता निर्णय घेतला आहे.

२. या माजी सैनिक महामंडळाची ठळक उद्दीष्टे खालीलप्रमाणे असतील.

१) माजी सैनिकांना सरकारी, निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरण व खाजगी विभागामध्ये सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करून देणे. त्यासाठी महामंडळाच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशनमध्ये या कलमाचा अंतर्भाव करणे.

२) माजी सैनिकांसाठी स्वयंरोजगाराच्या योजना आखणे, तयार करणे, त्यासाठी आर्थिक मदत मिळवून देणे तसेच उद्योग धंदा सुरू करणे, व्यापार, वाणिज्यिक व सेवा उद्योगाची स्थापना करणे, त्यांचे प्रचलन करणे, इत्यादीबाबत माजी सैनिकांना मार्गदर्शन व मदत करणे.

शा. नि. ७०५


सैनिक कल्याण विभाग
सं. क्र.
उप संचालक (प्र.)
सह संचालक
उप संचालक

३) माजी सैनिकांच्या रोजगार आणि पुन:स्थापना योजना सुरु करणे,त्यांचे प्रचलन करणे प्रायोजन करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.

४) माजी सैनिकांचे कल्याण आणि पुन:स्थापना करण्याच्या दृष्टीने व्यवसायांची उभारणी करणे,तसेच उत्पादन खरेदी-विक्री,विनियमन,उभारणी,व्यवसायाबद्दल सुधारणा इ.उपक्रम सुरु करणे तसेच उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणे,विविध प्रकारचे उद्योग,यंत्रसामुग्री,निखळ सामग्री आणि उपकरणे,कच्चा माल इत्यादी भाडेतत्वावर मिळवून देणे, त्याबाबत सहाय्य करणे.

५) माजी सैनिकांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने विविध योजना आखणे व त्या कार्यान्वीत करणे.

६) माजी सैनिकांसाठी स्थापन करण्यात येणारे सदर महामंडळ मेस्को (MESCO) सैनिक कल्याण विभागाच्या यंत्रणेव्यतिरिक्त स्वतंत्रपणे परंतु सैनिककल्याण विभागाच्या यंत्रणेशी समन्वय राखून काम करील.

३. सदर महामंडळ निर्माण झाल्यावर हे तूर्त तरी अतिशय छोटया आकाराचे असेल. सदर महामंडळाचे मुख्यालय पुणे येथे राहील. या महामंडळाच्या संचालकाचे काम संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे हे अतिरिक्त कार्यभार म्हणून पहातील. त्याशिवाय एक व्यवस्थापक, एक अधीक्षक व एक कार्यकारी सहायक एवढा अधिकारी/कर्मचारी वृंद राहील.

४. सदर महामंडळ आर्थिक दृष्टया सक्षम व स्वंयपूर्ण व्हावे म्हणून सुमारे ५ कोटी रूपये इतके भागभांडवल उपलब्ध करून देण्यात यावे असा निर्णयही शासनाने घेतला आहे. या भागभांडवलापैकी जवान कल्याण विश्वस्त मंडळ (महाराष्ट्र) हया संस्थेकडे जमा असलेले रू.४ कोटी ५३ लाख माजी सैनिक महामंडळाच्या भागभांडवलासाठी उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच रू.५ लाख हे यावर्षीच्या अर्थसंकल्पात विधिमंडळास पूरक मागणी सादर करून शासकीय अनुदानातून उपलब्ध करून देण्यात यावे आणि उर्वरित भागभांडवल हे माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी प्रतिवर्षी जनतेकडून संकलीत करण्यात येणाऱ्या ध्वजदिन निधीअंतर्गत जमा होत असलेल्या कल्याणकारी निधीतून अर्थसहाय्याच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात यावे असा तत्वत: निर्णय घेण्यात आलेला असून त्यासंबंधीत आवश्यक ती पुढील कार्यवाही पूर्ण झाल्यावर जरूर ते आदेश निर्गमित केले जातील यासाठी विहित मार्गाने तरतूद करण्यात येईल आणि तरतूद झाल्याशिवाय यासाठी खर्च करता येणार नाही.

५. तसेच हे महामंडळ निर्माण झाल्यावर महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियम व

91C

कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम २३ अ अनुसार या महामंडळास अधिनियमातून सूट देण्याची कार्यवाही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून व्हावी असाही तत्वत: निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर महासंचालक, पुनर्वसन संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून या महामंडळामार्फत सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्ट चालविण्यासाठी मान्यता प्राप्त करून त्यांच्या सूचना व नियमानुसार राज्यातील विविध शासकीय / निमशासकीय व खाजगी संस्थांशी करार करून त्यांना लागणारे सुरक्षा कर्मचारी पुरविण्यात यावेत असाही निर्णय घेण्यात आलेला आहे.

६. वरीलप्रमाणे उद्दीष्टे असलेल्या ह्या महामंडळाची नोंदणी कंपनी अधिनियम १९५६ अनुसार कंपनी म्हणून करण्यात यावयाची आहे. वरील परिच्छेदांमध्ये उल्लीखिल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण होताच प्रस्तुत महामंडळाच्या स्थापनेबाबतचे सविस्तर आदेश काढण्यात येतील.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३७/२००२/व्यय - ४, दि.१७.१.२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. व. दिवाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,